ePaper
# प्रवासी रेल्वे 'हायजॅक' : पाकचे 100 सैनिक ठार, 100 पेक्षा जास्त प्रवासी ओलीस!

| वर्ष - 8 । अंक - 236 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज™

www.mahaenews.com | गुरुवार, दिनांक 13 मार्च 2025 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!





## बलुचिस्तानचे बंड : फुटीच्या उंबरठ्यावर

# पाकिस्तानचे तुकडे होणार!



### पाकिस्तानच्या असंतुष्ट प्रदेशात हिंसक निदर्शने : 'मोदी मोदी' चे नारे!

### प्रवासी रेल्वे 'हायजॅक' पाकचे 100 सैनिक ठार,

। इस्लामाबाद /नवी दिल्ली । वृत्तसंस्था । महाईन्यूज

**पाकिस्तान सरकारकडून वर्षानुवर्षे होत असलेल्या जबरदस्तीला आणि अमानुष अन्यायाला कंटाळलेल्या बलुचिस्तानमध्ये मोठा उठाव झाला असून पाकिस्तानच्या जोखडातून बाहेर पडण्याची घोषणा करण्यात आली आहे. बलुचिस्तान हा पाकिस्तानचाच भाग असला तरी तेथील बंडखोरांनी पाकिस्तानची प्रवासी रेल्वे पळवली असून रात्रंदिवस सुरू असलेल्या गोळीबारात किमान १०० पाकिस्तानी सैनिक ठार झाले आहेत. 'बलुचिस्तान लिबरेशन आर्मी' च्या बंडखोरांनी पाकिस्तानच्या या प्रवाशांना ओलीस ठेवले आहे. पाकिस्तानची आता 'छकले' पडणार हे जवळजवळ निश्चित झाले आहे.**

### बलुचिस्तानात 'मोदी मोदी' चे नारे

बलुचिस्तान प्रांत हा पूर्वीपासूनच पाकिस्तानपासून वेगळा होण्यास इच्छुक होता. संधी मिळाली, की त्या ठिकाणी मोठा उठाव देखील होत असतो, पण पाकिस्तानच्या सैनिकांनी बंदुकीच्या जोरावर त्यांना वर्षानुवर्षे दाबून ठेवले आहे. पाकिस्तानातून जाणारी जाफर रेल्वे तेथील बंडखोरांनी 'हायजॅक' केली आणि प्रवाशांना ओलीस ठेवले. यानंतर पाकिस्तानचे सैनिक तेथील बंडखोरांवर अक्षरशः तुटून पडले. पण, बंडखोरांनी किमान ७५ ते ८० सैनिकांना टिपले असल्याचे सांगण्यात येत आहे. चकमकीच्या वेळी हे बंडखोर 'मोदी..मोदी' म्हणून घोषणा देत होते, असे काही प्रत्यक्षदर्शींनी सांगितले.

### बलुची बंडखोरांचा वर्षानुवर्षे संघर्ष

बलुचिस्तान लिबरेशन आर्मी गेली अनेक वर्षे पाकिस्तानच्या विरोधात संघर्ष करत आहे आणि स्वतंत्र बलोच साठी लढा देत आहे. पाकिस्तानचे सैनिक आणि तेथील माध्यमे मात्र या संघटनेला दहशतवादी संघटना म्हणत असून पाकिस्तान सरकारकडून त्यांचे प्रचंड हाल होत आहेत. हा आमचा स्वतंत्रता संग्राम आहे, असे बलूची बंडखोर मात्र सांगत आहेत.

### बांगलादेश लढ्याशी साम्य ?

बलुचींचा आत्ताचा संघर्ष आणि १९७१ मध्ये बांगलादेशने दिलेला लढा यामध्ये बरेच साम्य असल्याचे तेथील नागरिक सांगत आहेत. पाकिस्तानकडून होत असलेल्या अन्यायाच्या विरोधात त्यावेळी बांगलादेशात प्रचंड लाट उमटली होती आणि सध्याच्या बलुचिस्तानमध्येही गेले अनेक वर्ष हीच लढाई सुरू आहे. पाकिस्तान आणि चीनच्या सैन्याला साफ करून बलुची बंडखोरांनी अनेक व्हिडिओ सुद्धा प्रसिद्ध केले आहेत, त्यावरून हा संघर्ष कोणत्या टोकाला पोहोचला आहे, हे स्पष्ट समजत आहे.

### प्रवासी रेल्वेच 'हायजॅक'

बलुची बंडखोरांनी मंगळवारी रात्री एक प्रवासी रेल्वेच हायजॅक केली. त्यामध्ये साधारण पाचशे प्रवासी होते. त्यावेळी पाकिस्तानच्या सैन्याबरोबर झालेल्या चकमकीत किमान शंभर सैनिक ठार झाल्याचा दावा बलुचीनी केला आहे. बाकी प्रवाशांना त्यांनी ओलीस ठेवले आहे. पाकिस्तानने मात्र या कारस्थानामागे भारताचा हात असल्याचा आरोप केला आहे. ही रेल्वे नैऋत्य बलुचिस्तानमध्ये असलेल्या क्वेट्टा शहरामधून खैबर खिंडीतून पेशावरला निघाली होती.

### स्वतंत्र बलुचिस्तानसाठी गेली 78 वर्षे संघर्ष..

संपूर्ण हिंदुस्तानवर जेव्हा ब्रिटिश राज्य करीत होते, त्यावेळी बलुचिस्तान हा ब्रिटिशांच्या अधिपत्याखाली नव्हता. तेथे भारतीयांप्रमाणे सण साजरे केले जातात. त्याचप्रमाणे तेथील सुशिक्षित असणाऱ्यांची संख्या जगातील पहिल्या पाच देशांमध्ये आहे. बुरखा किंवा हिजाब ही पद्धत अजून सुद्धा तेथे नाही. रंगीबेरंगी कपड्यामध्ये बलुचिस्तानचे नागरिक भारतीयांप्रमाणे दसरा, दिवाळी होळी, गरबा आणि दांडिया सुद्धा खेळण्यात गुंग असतात. भारत-पाक फाळणी झाली, त्यावेळी महंम्मद अली जीना यांनी तेथील राजा खान ऑफ कलात यांच्या नेतृत्वाखाली जबरदस्तीने बलुचिस्तान बळकावले आणि पाकिस्तानमध्ये विलीन केले. तेथूनच संघर्ष सुरू झाला. या असंतुष्ट बलुचिस्तानमध्ये बहुतेक दररोजच निदर्शने होत असतात आणि पाकिस्तानविरोधी नारे देताना भारताला अनुकूल अशा घोषणा दिल्या जातात त्यामध्ये 'मोदी मोदीं' चाही समावेश असतो.

### एकेकाळी प्रचंड साक्षरता आणि समृद्धी

बलुचिस्तानमध्ये प्रचंड साक्षरता आणि समृद्धी होती. बहुतेक नागरिक मोटारीने लंडनपर्यंत जात होते. त्या रस्त्याला अजूनही 'लंडन रोड' असे नाव आहे आणि एन एच ४० असा त्याचा क्रमांक आहे. हा उठाव आता शेवटचाच असल्याचे बलूची बंडखोरांचे म्हणणे असून सर्व तयारीनिशी ते पाकिस्तानशी लढत आहेत, असे

ePaper

होळी आणि धुलीवंदनात रंगाचा बेरंग होऊ नये यासाठी कडकोट बंदोबस्त

| वर्ष - 8 | अंक - 236 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज ™

## आतील पानांत


- रोहित शर्माचं मिशन बदलापूर?
- ट्रॉफी फायनलचा विजय कचऱ्यात टाका
- नितीश कुमार भांग पिऊन येतात
- एक्सप्रेसवरील हल्ल्याचा व्हिडिओ समोर


www.mahaenews.com | गुरुवार, दिनांक 13 मार्च 2025 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### अधिवेशनाच्या शेवटच्या आठवड्यात होणार मोठी घोषणा

# अजितदादांच्या राष्ट्रवादीला मोठं गिफ्ट

## पिंपरीचे आमदार अण्णा बनसोडे यांची विधानसभेच्या उपाध्यक्षपदी वर्णी लागण्याची शक्यता

**। मुंबई-पुणे । प्रतिनिधी । महाईन्यूज**

**विधानसभेचं उपाध्यक्षपद हे राष्ट्रवादी अजित पवार गटाला मिळणार असल्याची माहिती समोर आली आहे. राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते पिंपरीचे आमदार अण्णा बनसोडे यांच्या नावाची या पदासाठी चर्चा सुरू असल्याची माहिती देखील समोर आली आहे. त्यामुळे आता अण्णा बनसोडे यांची विधानसभेच्या उपाध्यक्षपदी वर्णी लागण्याची शक्यता आहे. विधिमंडळ कामकाजाच्या शेवटच्या आठवड्यात विधानसभेचे अपाध्यक्ष म्हणून त्यांची नियुक्ती केली जाऊ शकते, अशी माहिती समोर येत आहे.**





दरम्यान, विधानसभा निवडणुकीमध्ये भाजप हा राज्यात सर्वात मोठा पक्ष ठरल्यामुळे विधानसभेच्या अध्यक्षपदी देखील भाजप नेत्याचीच वर्णी लागली, राहुल नार्वेकर हे पुन्हा एकदा विधानसभेचे अध्यक्ष बनले, त्यांच्याविरोधात एकही अर्ज दाखल न झाल्यानं त्यांची बिनविरोध निवड झाली. मात्र त्यानंतर आता सर्वांचं लक्ष लागलं आहे ते म्हणजे विधानसभेचं उपाध्यक्षपद कोणाला मिळणार? शिवसेनेला की राष्ट्रवादी अजित पवार गटाला? याबाबत आता मोठी बातमी समोर आली आहे. लोकसभा निवडणुकीमध्ये महायुतीला मोठा धक्का बसला, अनेक दिग्गज उमेदवारांचा पराभव झाला होता, तर महाविकास आघाडीला मोठं यश मिळालं होतं. मात्र त्यानंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीत महायुतीनं जोरदार मुसंडी मारली. महायुतीला राज्यात स्पष्ट बहुमत मिळालं आणि पुन्हा एकदा महायुतीचं सरकार आलं. देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. महायुतीमध्ये भाजपनं सर्वाधिक 131 जागा जिंकल्या, तर शिवसेना आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाला देखील चांगलं यश मिळालं.

मात्र दुसरीकडे या निवडणुकीत महाविकास आघाडीचा दारून पराभव झाला. महाविकास आघाडीतील तीन पक्ष राष्ट्रवादी शरद पवार गट, काँग्रेस आणि शिवसेना ठाकरे गट मिळून केवळ 50 जागाच जिंकता आल्या.

### अजित पवार यांनी क बोलावली महत्त्वाची बैठक

आज अजित पवार यांनी राष्ट्रवादीची महत्त्वाची बैठक बोलावली आहे, या बैठकीला राष्ट्रवादीचे सर्व महत्त्वाचे नेते उपस्थित आहेत. या बैठकीला धनंजय मुंडे देखील हजर आहेत. या बैठकीमध्ये विधान परिषदेच्या जागांसंदर्भात चर्चा होणार असल्याची माहिती समोर येत आहे. तसेच इतरही काही विषयांवर चर्चा होणार आहे.

### शहरात महाविकास आघाडीला आणखी एक धक्का

## पिंपरी-चिंचवडमधील शिवसेनेच्या सुलभा उबाळे यांचा उबाठा गटाला 'जय महाराष्ट्र'

**। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**पिंपरी-चिंचवड शहरातील अत्यंत आक्रमक आणि धडाडीच्या शिवसेना नेत्या आणि माजी गटनेत्या सुलभा उबाळे यांनी अखेर ठाकरे गटाला 'जय महाराष्ट्र' केला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीमध्ये उबाळे यांनी शिवसेना शिंदे गटामध्ये प्रवेश केला. त्यामुळे शहरात ठाकरे गटाला मोठा धक्का मानला जात आहे.**



राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत, मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांच्या उपस्थितीमध्ये सुलभा उबाळे यांनी शिंदे गटात प्रवेश केला. उबाळे गेल्या 36 वर्षांपासून सक्रीय राजकारणात आहेत. महापालिकेतील विरोधी पक्षनेत्या, गटनेत्या म्हणून त्यांनी कारकीर्द गाजवली आहे. तसेच, शिरुर लोकसभा प्रमुख आणि पुणे जिल्हा संघटिका म्हणून त्या ठाकरे गटात कार्यरत होत्या.

शिवसेनेत उभी फूट पडली आणि एकनाथ शिंदे यांनी शिवसेना पक्षावर दावा केला. त्यावेळी उबाळे यांनी उद्धव ठाकरे यांच्यासोबत राहण्याचा निर्णय घेतला होता. विधानसभा निवडणूक 2024 मध्ये महाविकास आघाडीच्या माध्यमातून भोसरी विधानसभा मतदार संघ शिवसेनेला सोडला जाईल आणि मशाल चिन्हावर निवडणूक लढवता येईल, अशी तयारी त्यांनी केली होती.

### महिला शक्तीची साथ...

सुजाता काटे, भोसरी विधानसभा समन्वयक महिला आघाडी, शशिकला उभे, उपशहर संघटिका, भारती चकवे, विभाग संघटिका, निर्मला पाटील, उप शहर प्रमुख, लिलावती देवकाते, उप शहर प्रमुख, सांगिता टुपके, विभाग संघटिका, नजमा शेख, विभाग संघटिका दमयंती गायकवाड, उप विभाग संघटिका, तहेरा शेख, उप विभाग संघटिका, ममता कदम, विभाग संघटिका, कावेरी परदेशी, शाखाप्रमुख प्रिया जपे, उप शाखाप्रमुख, नयना पारखे, उप शाखाप्रमुख, स्मिता मोगरे, गटप्रमुख, लीना नेहते, गटप्रमुख मंदा पाटील, गटप्रमुख दीपा जागते गटप्रमुख, वैशाली जिडेवार, गटप्रमुख, नम्रता जाधव, गटप्रमुख, अश्विनी डोके, गटप्रमुख, प्रज्ञा कोटावडे, गटप्रमुख, स्वाती चौधरी, गटप्रमुख, समीक्षा जागते, गटप्रमुख, मंगल पाटील, गटप्रमुख, शिल्पा साळवे, गटप्रमुख यांनीही शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला.

## पोलिस आयुक्तांना पत्रव्यवहार करण्यात येणार

# महामार्गांच्या बस थांब्यावरही पोलिसांची गस्त!

## संवेदनशील बस थांब्यांवर पोलिसांची मदत घेण्याचा निर्णय

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**स्वारगेट बस स्थानकात बलात्कार प्रकरणानंतर सुरक्षाव्यवस्थेतील अभाव समोर आल्यानंतर आता महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (एमएसआरटीसी) महामार्गांवरील संवेदनशील बस थांब्यांवर पोलिसांची मदत घेण्याचा निर्णय घेतला आहे. 'एसटी' महामंडळाच्या ४२ बस स्थानकांच्या हद्दीतील १०० पेक्षा अधिक बस थांबे आहेत. यापैकी काही थांबे महामार्गालगत असून संवेदनशील बस थांबे निश्चित करून त्या ठिकाणी प्रतिबंधात्मक उपाययोजनांसाठी पोलिस आयुक्तांना पत्रव्यवहार करण्यात येणार आहे.**



पुणे, पिंपरी चिंचवड शहरासह ग्रामीण भागातील १४ आगारांतर्गत असणाऱ्या ४२ बस स्थानकांच्या हद्दीत एसटी' महामंडळाचे महामार्गालगत सार्वजनिक बांधकाम विभागाकडून बस थांबे आणि निवारे उभारण्यात आले आहेत. ग्रामीण भागातील नागरीकांना सुलभ प्रवास करण्यासाठी १०० पेक्षा अधिक थांब्यांची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. आगारातील बस स्थानकातून बस बाहेर पडल्यानंतर इतर स्थानकांव्यतिरिक्त केवळ या बस थांब्यांवर बस उभ्या केल्या जातात. ग्रामीण भागातून शहरात किंवा नगराच्या ठिकाणी व्यवसाय, नोकरी किंवा शिक्षणानिमित्त शेकडो प्रवासी दैनंदीन ये-जा करत असतात. महामार्गांवरील थांब्यांवर दैनंदीन प्रवाशांचीच संख्या कायम असून या प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी संबंधित ठिकाणी पोलिसांची गस्त वाढविण्यासंदर्भात प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात येणार आहे .विशेषत: चांदणी चौक, कात्रज, रावेत, चांदणी चौकातील बाह्यवळण ओलांडल्यानंतर महामार्गावरील हिंजवडी फाटयाजवळ मुंबईच्या दिशेने जाणारे आयटी कंपन्यातील प्रवासी कायम असतात. प्रवासी रात्री अपरात्री बस स्थानकापर्यंत जाण्याऐवजी महामार्गावरील बस थांब्यावर उभारून बस थाबवूनच प्रवास करतात. त्यामुळे या प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी 'एसटी' महामंडळाने निर्णय घेतला असल्याचे एसटी महामंडळाकडून सांगण्यात आले.प्रवासी आणि काळवेळ निश्चित करणार शहरातील महामार्गांवर वर्दळ असली, तरी ग्रामीण भागातील बस थांबे हे निर्जनस्थळी असल्याने या बस थांब्यांवर शुकशुकाट असतो. दैनंदीन प्रवास करणारे प्रवासी असल्याने अचानक बसला विलंब किंवा अडथळे येण्याची शक्यता असल्याने बसची प्रतीक्षा करत थांबावे लागते. अशा बस थांब्यांची संख्या निश्चित करण्यात येणार आहे. त्यानुसार बसचा मार्ग आणि काळवेळ निश्चित करण्यात येणार आहे. त्यानुसार पोलिसांकडून मदत घेण्यात येणार आहे.

### गस्त विढविण्याबाबत पत्र

पुणे शहरासह ग्रामीण भागातील महामार्गांवर १०० पेक्षा अधिक बस थांबे आणि निवारे उभारण्यात आले आहेत. महिला सुरक्षिततेसाठी सुरक्षा प्रतिबंधात्मक उपाय योजनेसाठी पोलिसांची मदत घेण्यात येणार आहे. लवकरच संवेदनशील आणि वर्दळीच्या बस थांबे निश्चित करून अशा थांब्यांची माहिती पोलिसांना पाठवून गस्त विढविण्याबाबत पत्र पाठविण्यात येणार आहे.

## सिंहगड इन्स्टिट्यूटवर कारवाई ?

## शंभर थकबाकीदारांकडे तब्बल 334 कोटींची थकबाकी

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महापालिकेच्या मिळकतकर विभागाची कोट्यवधी रुपयांची थकबाकी न भरणाऱ्या 'सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटी'वर (एसटीईएस) महापालिकेने कारवाई केली आहे. संस्थेच्या वडगाव आणि कोंढवा येथील एकूण १२८ मिळकतींना मिळकतकर विभागाने टाळे ठोकले आहे. या संस्थेकडे ३४५ कोटी रुपयांची थकबाकी आहे.**



महापालिकेचे आर्थिक वर्ष संपण्यासाठी अवघे २० दिवस शिल्लक आहेत. महापालिकेच्या मिळकत कर विभागाने घेतला आहे. यासाठी विशेष पथकांची नियुक्तीदेखील करण्यात आली आहे. मिळकतकराची थकबाकी असलेल्या सिंहगड संस्थेच्या एरंडवणे येथील मुख्यालयाला टाळे ठोकून महापालिकेने डिसेंबर २०२४ मध्ये नोटीस चिटकवली होती. त्यानंतरही संस्थेने थकबाकी भरलेली नाही.'एसटीईएस'च्या वडगाव बुद्रुक येथे ४३ इमारती असून, संस्थेच्या येथील मुख्यालयाला टाळे ठोकण्यात आले आहे. येथील एकूण १९८ कोटी ६१ लाख रुपये मिळकतकर थकित आहे. एरंडवणा येथील मिळकतीचे ४७ कोटी ४३ लाख रुपये थकित आहेत. तर कोंढवा बुद्रुक येथील सहा मिळकतींची २० कोटी ५० लाख रुपये इतकी थकबाकी आहे, असे मिळकत कर विभागाचे उपायुक्त माधव जगताप यांनी सांगितले.सिंहगड टेक्नीकल इन्स्टिट्यूट या शिक्षण संस्थेच्या शहरातील विविध भागात मिळकती आहेत. या मिळकतींच्या करासंदर्भात महापालिका व सिंहगड इन्स्टिट्यूट यांच्यामध्ये न्यायालयात वाद सुरू आहेत. संस्थेच्या १२८ मिळकतींचा तब्बल ३४५.४३ कोटी मिळकत कर थकलेला आहे. त्यामुळे महापालिकेच्या मिळकत कर विभागाने ज्या मिळकतीसंदर्भात न्यायालयाचे आदेश नाहीत, अशा मिळकतींवर कारवाई करण्याची मोहिम हाती घेतली आहे. यापूर्वी एरंडवणा येथील संस्थेचे मुख्य कार्यालय ४७.४३ कोटीच्या थकबाकीपोटी महापालिकेने सील केले आहे. लवकरच या मिळकतीच्या लिलावाची प्रक्रीया सुरू करण्यात येणार असल्याचे जगताप यांनी सांगितले. दरम्यान, या विषयावर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने (मनसे) आवाज उठवला. त्यामुळे प्रशासनाला कारवाई करावी लागली. टाळे ठोकलेल्या मिळकतींच्या माध्यमातून किती थकबाकी वसूल झाली, याची माहिती उपायुक्त माधव जगताप यांनी द्यावी, अशी मागणी मनसेचे सरचिटणीस हेमंत संभूस यांनी केली आहे.शहरातील सर्वाधिक थकबाकीदार असलेल्या १०० मिळकत धारकांची यादी महापालिकेच्या मिळकतकर विभागाने तयार केली आहे. या १०० थकबाकीदारांकडे महापालिकेची तब्बल ३३४.१० कोटी रुपयांची थकबाकी आहे.

### अनेक नामांकित व्यक्तींचा समावेश

सर्वाधिक कर थकबाकी फुरसुंगी भागातील असून ती १८ कोटी ४४ लाख ३७ हजार ५८५ रुपये इतकी आहे. तसेच या यादीमध्ये शहरातील अनेक नामांकित संस्था आणि व्यक्तींच्या नावांचा समावेश आहे.महापालिकेच्या मिळकतकर विभागाची कोट्यवधी रुपयांची थकबाकी न भरणाऱ्या 'सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटी'वर (एसटीईएस) महापालिकेने कारवाई केली आहे.

## भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांचे निवेदन


# हवा प्रदूषणाबाबत पर्यावरण मंत्र्यांना साकडे!

### पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांच्याकडे बैठकीची मागणी

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड शहर आणि परिसरात मोठ्या प्रमाणात नागरीकरण वाढले आहे. उपनगरांमध्ये गृहप्रकल्प उभारले जात आहे. धूळीचे साम्राज्य आणि हवा प्रदूषणामुळे सर्वसामान्य नागरिक, वाहनचालक यांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर राज्याच्या पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांच्या उपस्थितीमध्ये उच्चाधिकार समितीची बैठक घ्यावी. तसेच, हवा प्रदूषणाबाबत ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी केली आहे.**





महाराष्ट्र अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर आमदार लांडगे यांनी पर्यावरण मंत्री मुंडे यांना निवेदन दिले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, काही दिवसांपूर्वी, पुणे, पिंपरी-चिंचवड परिसरातील सोसायटीधारकांनी रस्त्यावर उतरून मूक मोर्चा काढला आणि हवा प्रदूषणाबाबत राज्य सरकारचे लक्ष वेधले आहे. वातावरणातील सिमेंट मिक्स धूळ आणि रस्त्यावरील अवजड वाहनांमुळे होणारे प्रदूषण यामुळे परिसरातील हवेची गुणवत्ता अत्यंत खालावली असून श्वसनाचे आजार वाढत आहेत. परिसरातील लहान मुले, वृद्ध आणि गरोदर महिलांमध्ये दम्याचे, ॲलर्जीचे आणि श्वसनासंबंधी आजारांचे प्रमाण वाढत आहे. यासह नैसर्गिक जीवनमानावर परिणाम: सिमेंटच्या धुळीचा थर रस्त्यांवर, गाड्यांवर आणि घरांवर साचत असून, नागरिकांचे जीवनमान ढासळत आहे, ही बाब गंभीर आहे.

तसेच, सर्वसामान्य नागरिकांना स्वच्छ आणि निरोगी वातावरण मिळाले पाहिजे. परंतु, पिंपरी-चिंचवडसह वेगाने विकसित होणाऱ्या शहरांमध्ये हवा प्रदूषणाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. सिमेंट मिक्स धूळ त्वरित बंद व्हावी. वाढत्या प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी कडक नियम आणि उपाययोजना लागू कराव्यात. वायू प्रदूषण पातळीची नियमित तपासणी करून अहवाल सार्वजनिक करावा. रस्त्यांची नियमित २ वेळा साफसफाई करून धुळीचे प्रमाण कमी करावे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनावर कठोर कारवाई केली जावी.

रस्त्यांवरील धूळ कमी करण्यासाठी टँकरद्वारे, एअर गन द्वारे नियमितपणे पाण्याचा फवारा मारला जावा. प्रदूषणामुळे नागरिकांच्या आरोग्यावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करून आवश्यक ती आरोग्यसेवा पुरवावी. रस्त्यांवरील झाडांची देखभाल आणि पाणी नियमित करावे, यासाठी संबंधित विभागाचे अधिकारी, स्थानिक स्वराज्य संस्था यांना आदेश द्यावेत, अशी मागणीही आमदार लांडगे यांनी केली आहे.

### हवा गुणवत्ता निर्देशांक चिंताजनक...

बुधवार, दि. 12 मार्च 2025 रोजी पिंपरी-चिंचवडमध्ये हवामान खात्याच्या एअर कॉलिटी इंडेक्सनुसार, गवळीनगर : 127, पार्क स्ट्रिट वाकड : 140, थेरगाव : 127, भोसरी 260, भूमकरनगर : 271, ट्रान्सपोर्टनगर निगडी : 140 असा हवा गुणवत्ता निर्देशांक आहे. मानवी आरोग्यासाठी किंवा निसर्ग परिसंस्थेसाठी 0 ते 50 असा हवा गुणवत्ता निर्देशांक चांगला मानला जातो. 0 ते 100 पर्यंत मध्यम आणि 100 ते 200 पर्यंतचा हवा गुणवत्ता निर्देशांक म्हणजे नागरी आरोग्यावर वाईट परिणाम करणारा आहे. माझ्या पिंपरी-चिंचवड शहरात एकाही ठिकाणी AQI 50 पेक्षा कमी नाही, ही बाब चिंताजनक आहे.



"पिंपरी-चिंचवड, पुणे परिसरातील हवा प्रदूषणाला प्रतिबंध करण्यासाठी ठोस उपाययोजना आणि नियमांमध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता असून, त्या दृष्टीने पर्यावरण विभागाची उच्चाधिकार समितीची बैठक नियोजित करावी. त्यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रमुख अधिकाऱ्यांसह लोकप्रतिनिधी यांना सूचना मांडण्याची संधी मिळावी, अशी आग्रही मागणी आहे. यावर महायुती सरकार आणि पर्यावरण विभागाच्या वतीने सकारात्मक कार्यवाही होईल, अशी अपेक्षा आहे.

**–महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

## विधान परिषदसाठी पिंपरी-चिंचवडला हवी संधी!

### राष्ट्रवादीच्या बैठकीत ठराव : शहराध्यक्ष योगेश बहल यांची मोर्चेबांधणी

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आगामी विधान परिषद निवडणुकीत पिंपरी-चिंचवड शहराला विधान परिषद सदस्य म्हणून योग्य त्या कार्यकर्त्याला संधी मिळावी. यासाठी मध्यवर्ती कार्यालयता बहुमताने ठराव पारीत करण्यात आला. तसेच, शहरातील नेत्याला राज्यात प्रतिनिधीत्व करण्याची संधी द्यावी, अशी मागणी या ठरावाद्वारे पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे करण्यात आली आहे.**





आगामी महाराष्ट्र राज्यातील विधान परिषद निवडणूक ही दि.२७ मार्च २०२५ रोजी होणार असून, दिनांक १० ते १७ मार्च दरम्यान नामनिर्देशन पत्र भरण्यात येणार असून त्यासाठी पिंपरी चिंचवड शहराला प्रतिनिधित्व मिळण्यासाठी सदर बैठकीत विषय घेण्यात आला. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका लक्षात घेता शहरात पक्षाला अधिकची ताकद मिळण्यासाठी विधानपरिषदेच्या माध्यमातून संधी मिळावी, अशी बैठकीत चर्चा करण्यात आली. यासंदर्भात पक्षाच्या मध्यवर्ती कार्यालयात बैठक घेण्यात आली.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली दि. १६ जुलै २०२४ रोजी पुणे येथील सर्किट हाऊस येथे पिंपरी चिंचवड शहरातील आजी-माजी नगरसेवक नगरसेविका यांच्या एकत्रित बैठकीमध्ये जवळपास १४० आजी माजी नगरसेवक, नगरसेविका, पदाधिकारी उपस्थित होते. सन १९८७ ते २०२२ पर्यंतचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते. या बैठकीमध्ये सर्वांची एक मुखी मागणी होती की, आगामी विधान परिषद निवडणुकीमध्ये शहरामधून योग्य त्या कार्यकर्त्याला आपण संधी द्यावी तसेच विविध महामंडळ अध्यक्ष तसेच राज्य सदस्य या पदांच्या माध्यमातून अधिकची संधी मिळावी, असा ठराव शहर कार्याध्यक्ष फजल शेख यांनी मांडला व त्याला अनुमोदन महिला अध्यक्ष कविता आल्हाट व सामाजिक न्याय विभाग अध्यक्ष संजय औसमल यांनी दिले.

### बैठकीला झाडून पदाधिकारी उपस्थित...

यावेळी महिला अध्यक्ष कविता आल्हाट, कार्याध्यक्ष फजल शेख, शेखर काटे, वर्षा जगताप, चेतन दुधाळ, ज्ञानेश्वर कांबळे, सचिन आवटे, विजय लोखंडे, संजय औसरमल, बन्सी पारडे, शांती सेन, अकबर मुल्ला, महेश झपके, गंगा धेंडे, कविता खराडे, ज्योती गोफने, संगीता कोकणे, बाबुराव शितोळे, डॅनियल दळवी, राजेंद्र सिंग वालिया, निर्मला माने, बाळासाहेब चौधरी, मनीष शेडगे, कुमार कांबळे, बाळासाहेब पिल्लेवार, प्रशांत महाजन, यश बोथ, शुभदा पवार, मेहक इनामदार, मनीषा गटकळ, सुनीता अडसूळ, सविता धुमाळ, आशा मराठे, माधवी सोनार, मिरा कदम, सपना कदम, रिजवाना सय्यद, वर्षा शेडगे, लता सोनवणे, तिरमलर कवडे, धनाजी तांबे, विजय दळवी, राजू चांदणे, अंकुश बाबर, सुनील अडागळे, जियाउद्दीन नागुर इत्यादींसह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### प्रपंचात 'राम कर्ता' ही भावना ठेवावी.

परमात्मा आनंदरूप आहे. भगवंताचा आनंद हा उपाधिरहित आहे. भगवंताच्या हास्यमुखाचे ध्यान करावे. प्रत्येक गोष्टीत मनुष्य आनंद पाहात असतो. उकाड्यात वारा आला, त्याला वाटते बरे झाले; पाऊस आला की त्याला वाटते, आता गारवा येईल. कोणत्याही तऱ्हेने काय, मनुष्य आनंद साठवू पाहात असतो. मनुष्याला भूक लागेल तेव्हा तो जर अन्न खाईल तर त्याचे पोट भरेल आणि त्यापासून त्याला आनंद होईल; परंतु त्याने विष खाल्ले तर त्याने आनंद न होता मरण मात्र येईल. तसे आपले होते. आपण विषयातून आनंद घेऊ पाहतो आणि तो बाधक होतो. एखाद्या रोग्याला जर जंत झाले आणि त्याला जर खूप खायला घातले तर ते शरीराला पोषक न होता जंतच वाढतात; त्याचप्रमाणे आपण सत्कर्मे करताना पोटात विषयांचे प्रेम ठेवून ती केली, तर त्यामुळे विषयच पोसले जाऊन, त्यांपासून समाधान लाभू शकत नाही. याकरिता कर्तव्यबुद्धीने कर्म करावे, म्हणजे ते बाधक ठरत नाही.

मनुष्य जन्मभर जो धंदा करतो त्याच्याशीच तो तद्रूप होऊन जातो. एखादा वकील घ्या, तो त्याच्या धंद्याशी इतका तद्रूप होतो की, मरतेवेळीसुद्धा तो वादच करीत जाईल. नोकरी करणारा नोकरीशी इतका तद्रूप होतो की, स्वप्नातदेखील तो स्वत:ला नोकर समजूनच राहतो. कर्म कसे करावे तर त्याच्यातून वेगळे राहून. लग्नाचा सोहळा भोगावा, लाडू खावेत, परंतु ते दुसऱ्याचे आहेत असे समजून. आपल्या मुलीचे किंवा मुलाचे नाहीत असे मानून; नाही तर व्याह्यांची काळजी लागायची, किंवा हुंडा मिळतो की नाही इकडे लक्ष लागायचे ! त्यामुळे तापच निर्माण होईल. कर्माशिवाय कोणालाच राहता येत नाही. एखाद्याला शिक्षा द्यायची म्हणून, 'अगदी हलायचे नाही, पापणी, हात, पाय, काहीही हलवता कामा नये,' असे सांगितले तर ते जसे त्याला शक्य होणार नाही, तसे काही ना काही तरी कर्म हे होणारच. भगवंतांनी अशी काही सांगड घालून दिली आहे की, कर्म केल्याशिवाय गत्यंतरच नाही. परंतु ती कर्मे 'राम कर्ता' ही भावना विसरून केली तर बाधक होतात आणि मरणापर्यंत माणूस पुढल्या जन्माची तयारी करीत राहतो; तेव्हा, देहाने कर्म करतानाही ' कर्ता मी नव्हे ' हे जाणून कर्म करावे. आपल्याला कर्म केल्याशिवाय करमत नाही. पण आपण फळाची आशा उगीचच करीत असतो. आपण फळाची आशा सोडून कर्म करू लागलो, की ते कर्म करीत असतानाच समाधान प्राप्त होते.

**बोधवचन:- प्रपंचात सर्वांकरिता सर्व करावे , पण मनात मात्र 'मी रामाचा आहे' ही अखंड आठवण ठेवावी, म्हणजेच त्याच्या नामात राहावे.**

# उद्धवजींचे 'स्थगिती' नेचर, देवाभाऊंचे 'प्रगती' फीचर!



'स्टेट'मेंट

अधिकराव दिवे-पाटील

संस्थापक, संपादक



**"वारंवार स्थगिती द्यायला मी उद्धव ठाकरे नाही", मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे वाक्य चांगलेच गाजले ! त्याचे कारण असे आहे की उद्धव ठाकरे हे अल्पकाळ मुख्यमंत्री होते कधीही प्रत्येक गोष्टीला कधी तू देणारे मुख्यमंत्री म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. बरोबर या उलट देवेंद्र फडणवीस यांची खासियत आहे. उत्साहाने आणि हिरीरीने विकास कामे सुरू ठेवायची, भ्रष्टकामांना ब्रेक लावायचा आणि धडाधड निर्णय घ्यायचे, हे त्यांचे प्रगतीचे गुपित आता लपून राहिलेले नाही !**

### नाते विळ्या-भोपळ्याचे!

देवेंद्र फडणवीस आणि उद्धव ठाकरे यांच्यातील विळ्या - भोपळ्याचे सख्य जगजाहीर आहे. निवडणुकीच्या काळात आणि नंतरही उद्धव ठाकरेंनी फडणवीस यांना 'मी तुला बघून घेईन', 'एक तर तू राहशील नाहीतर मी राहीन', अशा शब्दात धमक्या दिल्या होत्या. यापूर्वी फडणीस यांचा कलंक, फडतूस अशा शेळक्या भाषेतही उल्लेख केला होता, हे आठवत असेलच !

फडणवीस हे सर्व शांतपणे बघत होते आणि बुद्धिबळाच्या पटावरील आपली प्यादी पुढे दामटत होते. कुठेही आदळआपट नाही, कुठेही थयथयाट नाही.. त्यांना एक नक्की माहीत होते की शेवटी विजय त्यांचाच आहे!

### 'टिपीकल' शैलीत उत्तर..

काही वेळा, फडणवीसांनीही आपल्या शैलीत ठाकरेंना उत्तरही दिले होते. अजूनही एकमेकांचा हिशेब चुकता करण्याचा दोघेही प्रयत्न करत असतात. गेल्या आठवड्यात विधानसभेत कोणीतरी आमदाराने शिंदेंच्या काळातील काही कामांना फडणवीस स्थगिती देत असल्याचा आरोप केला. त्यावेळी उठून उभे राहत लगेचच फडणवीस उत्तरले, "वारंवार स्थगिती द्यायला, मी काय उद्धव ठाकरे आहे का ?" या वक्तव्यावरून त्यांनी अनेक गोष्टी साधल्या, पण उद्धव ठाकरे हे स्थगितीबहाद्दर आहेत, असा संदेशही त्यांनी देऊन टाकला.

### उद्धव ठाकरेंचीही टोलेबाजी

ठाकरेंनी देखील फडणवीसांच्या या टोलेबाजीला लगेचच उत्तर देत हिशेब चुकता केला. ठाकरे गटाच्या एका मेळाव्यात बोलताना उद्धव ठाकरेंनी ठणकावले, की तुम्ही उद्धव ठाकरे कधीच बनू शकणार नाही. उद्धव ठाकरे व्हायला काय काय करावे लागेल, याची यादीही ठाकरेंनी या मेळाव्यात बोलताना वाचली.

### जणू काही, सत्तेचा अमरपट्टा

थोडेसे इतिहासात डोकावले, तर स्थगिती देण्याचा उद्योग खरे तर उद्धव ठाकरेंनीच केला होता. मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतल्यावर त्यांनी देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असतानाच्या काळातील अनेक कामांना स्थगिती दिल्याचे बोलले जात होते. त्यावर त्या काळात बरीच टीकाही झाली होती. मात्र, ठाकरेंना त्याची काहीही खंत नव्हती हे विशेष. दोन्ही काँग्रेसने पाठिंबा दिल्यामुळे सत्तेचा अमरपट्टा घेऊन आपण आलो आहोत, असे काही काळ त्यांना भासले होते. अजूनही उद्धव ठाकरे आपल्या मुख्यमंत्रीपदाच्या काळातल्या सुखद स्वप्नातच वावरत आहेत. ते स्वप्न वास्तवात आलेलेच नाही, हे त्यांच्या आणि त्यांच्या भोवती वावरणाऱ्या स्तुतीपाठकांच्या लक्षात येत नाही, हे पण एक वैशिष्ट्य !

### मुख्यमंत्रीपदाचे स्वप्न काही जात नाही!

विधानसभा निवडणुकीपूर्वी पुन्हा महाआघाडी सत्तेत येणार आणि आपणच मुख्यमंत्री होणार, असे स्वप्न त्यांना पडत होते. मात्र, त्यांचे ते स्वप्न भंगले. तरी आजही त्यांना आपण पुन्हा मुख्यमंत्री होऊ, असे स्वप्न पडतेच आहे काहीतरी चमत्कार घडेल, किंबहुना, शरद पवार असा चमत्कार घडवतील आणि आपणच पुन्हा मुख्यमंत्री होऊ, या खोट्या आशेवर उद्धव ठाकरे एक-एक दिवस ढकलत आहेत. अर्थात् त्यांच्याभोवती वावरणारी चांडाळ चौकडी याला कारणीभूत आहे, ही चौकडी त्यांना स्वप्नात ठेवण्यात यशस्वी झालेली आहे, हे वेगळे सांगायला नको!

### समोरासमोर आल्यानंतर नमस्कार चमत्कार!

एरवी एकमेकांना पाण्यात पहात एकमेकांवर टीका करणारे, एकमेकांबाबत गरळ ओकणारे हे माजी आणि आजी मुख्यमंत्री नुकतेच समोरासमोर आले, आणि दोघांनीही एकमेकांना नमस्कारही केला. टीव्हीवरील मोठमोठ्या बातम्याही झळकल्या!

### भेटीवेळी नेमके काय घडले?

झाले असे, की सोमवारी विधिमंडळात अर्थसंकल्प सादर करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे हे बाहेर निघाले होते. नेमके त्यावेळी समोर उद्धव ठाकरे विधान परिषदेतून निघून शिवसेना कार्यालयाकडे जात होते. दोघेही समोरासमोर येताच दोघांनीही एकमेकांना नमस्कार केला. त्यावेळी तुम्ही अर्थसंकल्पात 'मर्सिडीज' च्या किमती वाढवल्या नाहीत का? असा खोचक सवालही उद्धव ठाकरेंनी फडणवीस यांना विचारला. संदर्भ होता एकनाथ शिंदे यांच्या गटाच्या नेत्या डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या वादग्रस्त वक्तव्याचा!

### नको तिथे पण ठाकरेंची टोलेबाजी !

मात्र, फडणवीस काहीही उत्तर न देता स्मितहास्य करत पुढे सरकले. यावेळी सोबत असलेल्या एकनाथ शिंदेंनी मात्र ठाकरेंकडे चक्क दुर्लक्ष केले आणि ते पुढे निघून गेले.अजित पवारांनी मात्र ठाकरेंना हस्तांदोलन केले. त्यावेळी हा अर्थसंकल्प तुमच्या मनासारखा नाही का ? असा टोलाही उद्धव ठाकरेंनी अजित पवारांना लगावला. एकूणच विधान भवनाच्या लॉबीत या नेत्यांनी परस्परांवर शाब्दिक फुलबाज्या उडवल्या हे खरे! अर्थात् नंतर झालेल्या पत्रकार परिषदेत देवेंद्र फडणवीस आणि अजित पवारांनी ठाकरेंचा हिशोब चुकता केला हे सांगण्याची गरज नाही. प्रश्न कामांचा असो, वक्तृत्वाचा असो, किंवा निर्णय घ्यायचा असो, देवेंद्र फडणवीस यांची शिस्तबद्धता आणि तडफ उद्धव ठाकरेंपासून अजून कोसो दूर आहे, हे नक्की ! पण, प्रत्येक गोष्टीत फडणवीस हे उद्धव ठाकरेंपेक्षा सरस आहेत, हे उद्धव ठाकरेंचे चेले सुद्धा सांगतील !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.

**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# सरकारचं डोकं ठिकाणावर आहे का?

## मराठी सणांचा उल्लेख करत आदित्य ठाकरेंची टीका

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकतेच, प्रार्थनास्थळांवर लाऊडस्पीकरसाठी ठरवून दिलेल्या आवाजाच्या मर्यादेचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचा इशारा दिला होता. याबाबत बोलताना फडणवीस यांनी केंद्र सरकार आणि न्यायालयांच्या आदेशांचे दाखले देत मार्गदर्शक नियमांचे काटेकोरपणे पालन करावी लागेल असे म्हटले होते.**



यानंतर माजी मंत्री आणि शिवसेनेचे (उद्धव ठाकरे) आमदार आदित्य ठाकरे यांनी, 'माईक आणि लाऊडस्पिकरचे नियम' दाखवून कोळीवाड्यातल्या उत्सवावर विरजण घालण्याचं काम सुरू असल्याचा आरोप केला आहे. याचबरोबर त्यांनी, "महाराष्ट्र सरकारचं डोकं ठिकाणावर आहे का?", असा प्रश्नही उपस्थित केला आहे.आज एक्सवर केलेल्या एका पोस्टमध्ये आदित्य ठाकरे म्हणाले की, "महाराष्ट्र सरकारचं डोकं ठिकाणावर आहे का? आधीच आमच्या गणेश मंडळांना विविध नियमांमध्ये अडकवून आणि विसर्जनाचा प्रश्न प्रलंबित ठेवून छळलं जातंय आणि आता कोळीबांधवांसाठीच नाही तर सर्व हिंदू धर्मीयांसाठी महत्वाच्या असलेल्या होळी सणाच्या वेळी 'माईक आणि लाऊडस्पिकरचे नियम' दाखवून माझ्या वरळी मतदारसंघातल्या कोळीवाड्यातल्या उत्सवावर विरजण घालण्याचं काम सुरु आहे."आपल्या पोस्टमध्ये आदित्य ठाकरे पुढे म्हणाले की, "या सरकारला मराठी माणसांच्या सणांविषयी इतका आकस का आहे? 'चुनावी हिंदुत्व राबवायचं आणि सत्तेत आल्यावर मात्र मराठी सणांवर बंधनं घालायची', ही कसली निती?

"भाजपा आमदार देवयानी फरांदे यांनी दोन दिवसांपूर्वी विधानसभेत मशिदींमधील लाऊडस्पीकरचा मुद्दा उपस्थित केला होता. "लाऊडस्पीकरमुळे होणारे ध्वनी प्रदूषण धोकादायक बनले आहे. मशिदींमध्ये लाऊडस्पीकर वाजतात, ज्यामुळे लोकांना त्रास होतो. ते खूप मोठ्या आवाजात असतात," असे त्या म्हणाल्या होत्या. नियमांचे उल्लंघन करून लाऊडस्पीकरचा वापर केला जात असल्याचा आरोपही त्यांनी केला.याला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले होते की, "केंद्र सरकार आणि न्यायालयाच्या आदेशानुसार, प्रार्थनास्थळांवर लाऊडस्पीकरसाठी असलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोरपणे पालन करावे लागेल. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल. रात्री १० ते सकाळी ६ वाजेपर्यंत लाऊडस्पीकरचा वापर करू नये. सकाळी, लाऊडस्पीकरसाठी परवानगी असलेली आवाजाची मर्यादा ५५ डेसिबल तर रात्री ती ४५ डेसिबल आहे."यानंतर माजी मंत्री आणि शिवसेनेचे (उद्धव ठाकरे) आमदार आदित्य ठाकरे यांनी, 'माईक आणि लाऊडस्पिकरचे नियम' दाखवून कोळीवाड्यातल्या उत्सवावर विरजण घालण्याचं काम सुरू असल्याचा आरोप केला आहे. याचबरोबर त्यांनी, "महाराष्ट्र सरकारचं डोकं ठिकाणावर आहे का?", असा प्रश्नही उपस्थित केला आहे.आज एक्सवर केलेल्या एका पोस्टमध्ये आदित्य ठाकरे म्हणाले की, "महाराष्ट्र सरकारचं डोकं ठिकाणावर आहे कामाईक आणि लाऊडस्पिकरचे नियम' दाखवून माझ्या वरळी मतदारसंघातल्या कोळीवाड्यातल्या उत्सवावर विरजण घालण्याचं काम सुरु आहे.

### ज्यामुळे लोकांना त्रास होतो

या सरकारला मराठी माणसांच्या सणांविषयी इतका आकस का आहे? 'चुनावी हिंदुत्व राबवायचं आणि सत्तेत आल्यावर मात्र मराठी सणांवर बंधनं घालायची', ही कसली निती?"भाजपा आमदार देवयानी फरांदे यांनी दोन दिवसांपूर्वी विधानसभेत मशिदींमधील लाऊडस्पीकरचा मुद्दा उपस्थित केला होता."लाऊडस्पीकरमुळे होणारे ध्वनी प्रदूषण धोकादायक बनले आहे. मशिदींमध्ये लाऊडस्पीकर वाजतात, ज्यामुळे लोकांना त्रास होतो. ते खूप मोठ्या आवाजात असतात," असे त्या म्हणाल्या होत्या. नियमांचे उल्लंघन करून लाऊडस्पीकरचा वापर केला जात असल्याचा आरोपही त्यांनी केला.

---

# 'MPSC च्या सर्व परीक्षा मराठीत होणार'

## मुख्यमंत्री फडणवीस यांची विधान परिषदेत माहिती

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**सध्या सुरू असलेले राज्य विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन विविध मुद्द्यांनी गाजत आहेत. अशात आज विधान परिषदेत महाराष्ट्र लोकसेवा आयोगामधील विविध विषयांवरही चर्चा झाल्याचे पाहायला मिळत आहे. आज विधानपरिषदेचे सदस्य मिलिंद नार्वेकर यांनी एमपीएससीच्या परीक्षा मराठीत घेण्यासंदर्भात प्रश्न उपस्थित केला होता.**




आमदार नार्वेकर यांच्या प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एमपीएससीच्या सर्व स्पर्धा परीक्षा मराठीत घेण्याची राज्य सरकारची योजना असल्याचे स्पष्ट केले आहे. मुख्यमंत्र्यांनी याबाबत एक्सवरही पोस्ट करत माहिती दिली आहे.देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत एक्सवर पोस्ट करत म्हटले की, "विधानपरिषद सदस्य मिलिंद नार्वेकर यांनी एमपीएससीच्या परीक्षा मराठीत घेण्यासंदर्भात प्रश्न उपस्थित केला होता. सध्या अभियांत्रिकी आणि कृषी तांत्रिक पदांच्या परीक्षा इंग्रजीत घेतल्या जातात, कारण संबंधित पुस्तके मराठीत उपलब्ध नाहीत. मात्र, आता अभियांत्रिकी शिक्षण मराठीत घेण्यास परवानगी मिळाल्याने लवकरच या अभ्यासक्रमाची पुस्तके मराठीत उपलब्ध होतील. त्यानुसार, सर्व तांत्रिक पदांच्या परीक्षा मराठीत घेण्याचे नियोजन राज्य शासनाने केले आहे."याचबरोबर आज विधानपरिषदेचे सदस्य सतेज ऊर्फ बंटी पाटील, अभिजित वंजारी, भाई जगताप, जयंत आसगावकर, राजेश राठोड, धीरज लिंगाडे, डॉ. प्रज्ञा सातव, मिलिंद नार्वेकर, सुनिल शिंदे यांनी एमपीएससी संदर्भात विविध प्रश्न उपस्थित केले होते. यावेळी एमपीएससीमार्फत होणारी पदभरती आणि पारदर्शकता व पेपरफुटीवरही प्रश्न विचारण्यात आले होते. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उत्तरे दिली आहेत.यावेळी, शासनाने रिक्त पदे भरण्यासाठी घोषणा करुनही १५ पेक्षा जास्त विभागात भरती प्रक्रिया राबविण्यात आली नाही, तसेच तलाठी व जिल्हा परिषदेची भरती प्रक्रिया राबविल्यानंतर उमेदवार पात्र होऊनही त्यांना नियुक्तीचे पत्र दिले नाही, हे ही खरे आहे का? असा प्रश्न विचारण्यात आला होता.याला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, "तलाठी तसेच जिल्हा परिषदेतील पदे ही महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरली जात नाहीत. तसेच नियुक्ती पत्र देण्याची कार्यवाही देखिल आयोगामार्फत केली जात नाही. त्यामुळे या विषयाचा आयोगाच्या मनुष्यबळाशी कोणताही संबंध नाही."

### 15 पेक्षा जास्त विभागात भरती

आमदार नार्वेकर यांच्या प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एमपीएससीच्या सर्व स्पर्धा परीक्षा मराठीत घेण्याची राज्य सरकारची योजना असल्याचे स्पष्ट केले आहे. सध्या अभियांत्रिकी आणि कृषी तांत्रिक पदांच्या परीक्षा इंग्रजीत घेतल्या जातात, कारण संबंधित पुस्तके मराठीत उपलब्ध नाहीत.

# जाफर एक्सप्रेसवरील हल्ल्याचा व्हिडिओ समोर!

## बलुचिस्तानी फुटीरतावाद्यांनी प्रवाशांवर रोखल्या बंदुका

। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**पाकिस्तानमधील अशांत अशा बलुचिस्तान प्रांतात फुटीरतावाद्यांनी सुमारे ५०० प्रवाशांना घेऊन पेशावरला जाणाऱ्या जाफर एक्सप्रेसवर हल्ला करून त्यातील शेकडो प्रवाशांचे अपहरण केले होते. दरम्यान रेल्वेतील प्रवाशांची सुटका करण्यासाठी पाकिस्तानी लष्कराचे प्रयत्न सुरू असून, काही प्रवाशांची सुटका करण्यात यश आले आहे. अशात आता या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारणाऱ्या बलुच लिबेरशन आर्मीने जाफर एक्सप्रेवरील हल्ल्याचा व्हिडिओ शेअर केला आहे.**



या व्हिडिओच्या पहिल्या दृश्यात फुटरतावाद्यांनी रेल्वे रुळांवर स्फोट घडवून आणत जाफर एक्सप्रेसला थांबण्यास भाग पाडल्याचे दिसत आहे. त्यानंतर बलुच लिबेरशन आर्मीच्या लोकांनी रेल्वेवर गोळीबार केला आणि व्हिडिओच्या शेवटी ते रेल्वेतील प्रवाशांना बाहेर काढून त्यांना ताब्यात घेत असल्याचे दिसत आहे.पाकिस्तानातील क्वेट्टा आणि सिबी दरम्यान १०० किलोमीटरपेक्षा जास्त लांबीचा बोलान बोगदा आहे. या दरम्यान १७ रेल्वे स्थानके आहेत. येथे आव्हानात्मक भूभागामुळे गाड्या अनेकदा मंदावतात. याचाच फायदा घेत काल फुटीरतावाद्यांनी जाफर एक्सप्रेसवर हल्ला करत प्रवाशांचे अपहरण केले होते.दरम्यान, या हल्ल्यांच्या दुसऱ्या दिवशी पाकिस्तानी सुरक्षा दलांनी किमान २७ फुटीरतावाद्यांना ठार केले असून, १५५ प्रवाशांची सुटका केली आहे. सुरक्षा सूत्रांनी सांगितले की, बचाव मोहिमेदरम्यान ३७ प्रवासी जखमी झाले असून, त्यांना वैद्यकीय उपचारांसाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे, असे वृत्त पीटीआय वृत्तसंस्थेने दिले आहे. जाफर एक्सप्रेसवरील हल्ल्याची जबाबदारी स्वीकारणाऱ्या बलुच लिबेरशन आर्मीने पाकिस्तान सरकारकडे अनेक मागण्या केल्या आहेत. यात बलुचिस्तानमध्ये पाकिस्तानच्या कोणत्याही सुरक्षा एजन्सीचा प्रभाव नसावा, या प्रांतात सुरक्षा एजन्सीचा प्रतिनिधी नसावा, ही प्रमुख मागणी आहे.यासह चीन सरकारने बलुच प्रांतात सुरू केलेल्या सीपीईसी प्रकल्पावर बलुचिस्तानी लोक नाराज आहेत. या प्रकल्पाद्वारे बलुच प्रांतातील खनिजे लुटली जात असल्याचा येथील लोकांचा दावा आहे. तसेच या प्रकल्पामुळे बलुच प्रांतातील हजारो लोकांना विस्थापित व्हावं लागलं आहे.

काही वेळा सरकारने स्थानिकांच्या मागण्या धुडकावून त्यांचं विस्थापन केलं आहे. त्यामुळे बलुच लोक गेल्या अनेक वर्षांपासून या प्रकल्पाविरोधात आंदोलन करत आहेत. याच काळात काही फुटीरतावाद्यांनी शस्त्रे हाती घेतली. दुसऱ्या बाजूला, सरकारने बलुचिस्तानी लोकांच्या आंदोलनाची दखल घेतली नाही. त्यामुळे संघर्ष वाढला आहे. बलुचिस्तानी फुटीरतावाद्यांनी हल्ला करण्याची ही काही पहिली वेळ नाही. यापूर्वी सीपीईसी प्रकल्पाला विरोध म्हणून फुटीरतावाद्यांनी अनेक वेळा पाकिस्तानवर असे हल्ले केले आहेत. तसेच चिनी अभियंते आणि पाकिस्तानी राजदूतांनाही लक्ष्य केले आहे.या व्हिडिओच्या पहिल्या दृश्यात फुटरतावाद्यांनी रेल्वे रुळांवर स्फोट घडवून आणत जाफर एक्सप्रेसला थांबण्यास भाग पाडल्याचे दिसत आहे१०० किलोमीटरपेक्षा जास्त लांबीचा बोलान बोगदा आहे. या दरम्यान १७ रेल्वे स्थानके आहेत. येथे आव्हानात्मक भूभागामुळे गाड्या अनेकदा मंदावतात. याचाच फायदा घेत काल फुटीरतावाद्यांनी जाफर एक्सप्रेसवर हल्ला करत प्रवाशांचे अपहरण केले होते.दरम्यान, या हल्ल्यांच्या दुसऱ्या दिवशी पाकिस्तानी सुरक्षा दलांनी किमान २७ फुटीरतावाद्यांना ठार केले असून, १५५ प्रवाशांची सुटका केली आहे. सुरक्षा सूत्रांनी सांगितले की, बचाव मोहिमेदरम्यान ३७ प्रवासी जखमी झाले असून, त्यांना वैद्यकीय उपचारांसाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे, असे वृत्त पीटीआय वृत्तसंस्थेने दिले आहे. जाफर एक्सप्रेसवरील हल्ल्याची जबाबदारी स्वीकारणाऱ्या बलुच लिबेरशन आर्मीने पाकिस्तान सरकारकडे अनेक मागण्या केल्या आहेत. यात बलुचिस्तानमध्ये पाकिस्तानच्या कोणत्याही सुरक्षा एजन्सीचा प्रभाव नसावा, या प्रांतात सुरक्षा एजन्सीचा प्रतिनिधी नसावा, ही प्रमुख मागणी आहे.

### फुटीरतावाद्यांनी शस्त्रे हाती घेतली

यासह चीन सरकारने बलुच प्रांतात सुरू केलेल्या सीपीईसी प्रकल्पावर बलुचिस्तानी लोक नाराज आहेत.काही वेळा सरकारने स्थानिकांच्या मागण्या धुडकावून त्यांचं विस्थापन केलं आहे. त्यामुळे बलुच लोक गेल्या अनेक वर्षांपासून या प्रकल्पाविरोधात आंदोलन करत आहेत. याच काळात काही फुटीरतावाद्यांनी शस्त्रे हाती घेतली.

# नितीश कुमार भांग पिऊन येतात!

## राबडी देवींचा संताप; बिहार विधीमंडळ सभागृहात जोरदार खडाजंगी

। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**राष्ट्रीय जनता दलाच्या (RJD) नेत्या राबडी देवी यांनी बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्याबद्दल केलेल्या वक्तव्यामुळे मोठा वाद होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. राबडी देवी म्हणाल्या की "नितीश कुमार हे भंगेडी (गंजेडी) आहेत. ते विधीमंडळात भांग पिऊन येतात. ते सभागृहात महिलांचा अपमान करतात." बिहार विधीमंडळाचं अर्थसंकल्पीय अधिवेशन चालू असून आज विधान परिषदेत नितीश कुमार व राबडी देवी यांच्यात खडाजंगी झाल्याचं पाहायला मिळालं.**



त्यानंतर राबडी देवी आणि त्यांच्या क्षाच्या आमदारांनी सभात्याग केला. राबडी देवींसह राजद आमदारांनी विधीमंडळाच्या पायऱ्यांवर बसून नितीश कुमार यांच्याविरोधात घोषणा देत आंदोलन केलं.यावेळी प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींनी राबडी देवी यांच्याशी बातचीत केली आणि आंदोलनाचं कारण विचारलं. त्यावर राबडी देवी म्हणाल्या, "नितीश कुमार भंगेडी आहेत. ते भांग पिऊन सभागृहात येतात. महिलांना काहीही बोलतात. त्यांना अपमानित करतात. बिहारच्या महिलांचा अपमान करतात. आमचा सभागृहात अनादर करतात. ते सभागृहात म्हणाले, २००५ च्या आधी राज्यात कोणी कपडे परिधान करत नव्हतं. मला त्यांना आणि त्यांचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना विचारायचं आहे की त्यांच्या घरातल्या लेकी-बाळी २००५ च्या आधी कपडे परिधान करत नव्हत्या का? त्यांच्या घरातील त्यांची आई, बहीण व मुली कपडे परिधान करत नव्हत्या का? २००५ च्या आधी बिहारमध्ये विकास झाला नव्हता का?राबडी देवी म्हणाल्या, "आम्ही बिहारसाठी काय केलंय हे राज्यातील जनतेला माहिती आहे. महिलांसाठी, वंचितांसाठी कामं केली आहेत. हे नितीश कुमार २००५ नंतर जन्माला आले आहेत का? त्यांचे पंतप्रधान २०१४ नंतर जन्माला आले आहेत का? त्यांच्या आधी राज्यात, देशात विकासकामे होत नव्हती का? माझ्यासह बिहारमधील महिलांना नितीश कुमार यांनी दुसऱ्यांदा अपमानित केलं आहे.

### राबडी देवींचा नितीश कुमारांवर संताप

राबडी देवींकडे बोट करून नितीश कुमार म्हणाले, "या लोकांच्या काळात राज्यात काही कामं व्हायची का? आम्ही सत्तेत आल्यावर एकेक करून सगळी कामं केली. हिंदू-मुस्लीम तेढ संपवली. महिलांसाठी काहीच केलं जात नव्हतं. आम्ही त्यांच्यासाठी कामं केली, आरक्षण दिलं. त्यानंतर नितीश कुमार व राबडी देवी यांच्यात खडाजंगी झाली.

# शाहरुख खान व अमिताभ यांच्यात होतं शत्रुत्व?

बॉलीवूड विश्वातील सुप्रसिद्ध कलाकारांच्या यादीत अग्रगण्य असणारे दोन मुख्य अभिनेते म्हणजे अभिनेता शाहरुख खानआणि महानायक अमिताभ बच्चनया दोन्ही कलाकारांनी त्यांचा एक काळ गाजवला आहे, त्यामुळे त्यांच्या चाहत्यांची संख्यादेखील फार मोठी आहे. शाहरुख व अमिताभ बच्चन यांची एक झलक पाहण्यासाठी चाहते कायमच उत्सुक असतात. शिवाय शाहरुख आणि अमिताभ बच्चन या सुपरस्टार्सचं नातंदेखील फार घट्ट आहे. पण मध्यंतरी एक काळ असा आला होता, ज्यात दोघांमधील शत्रुत्वाबद्दलच्या अनेक चर्चा झाल्या होत्या.१९७०-८० च्या दशकात अमिताभ (AMITABH BACHCHAN) यांनी आपल्या अभिनयाची जादू पसरवली होती. तर त्यांच्या पाठोपाठ ९० च्या शाहरुखने आपलं गारुड निर्माण केलं. याच काळात या दोघांमध्ये शत्रुत्व निर्माण झाल्याच्या बातम्या पसरल्या होत्या आणि शत्रुत्वाबद्दल शाहरुखने (SHAH RUKH KHAN) स्पष्टीकरण दिलं होतं. २००७ मध्ये शाहरुखने रेडिफच्या मुलाखतीत या चर्चांना स्पष्टपणे फेटाळून लावले. तसंच अभिनेत्याने अमिताभ बच्चन यांचे कौतुकही केले.याबद्दल शाहरुख (SHAH RUKH KHAN) असं म्हणाला होता की, “मला वाटते, या चर्चानिर्मितीचं कारण माध्यमं आहेत. ते बऱ्याच काळापासून प्रयत्न करत आहेत आणि शेवटी त्यांना काही प्रमाणात यश मिळाले आहे. पण माझ्यात आणि बच्चनजींमध्ये काहीही नाही”. या चर्चांच्या पार्श्वभूमीवर शाहरुखने अमिताभ बच्चन यांच्याशी संबंधित भूमिका साकारल्या होत्या. शाहरुखने अमिताभ यांच्या ‘डॉन’ चित्रपटाच्या रिमेकमध्ये काम केले होते.शाहरुखने (SHAH RUKH KHAN) २००७ मध्ये ‘कौन बनेगा करोडपती’च्या तिसऱ्या सीझनचे सूत्रसंचालनदेखील केले होते. अलीकडील एका सर्वेक्षणात असे दिसून आले आहे की, ‘कौन बनेगा करोडपती’च्या सूत्रसंचालनासाठी अमिताभ बच्चन यांच्यानंतर शाहरुख हा सर्वोत्तम पर्याय आहे.



# माधुरीचा जबरदस्त डान्स

“माधुरी दीक्षित इज डान्स अँड डान्स इज माधुरी” असं कॅप्शन दिलेले अनेक व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. त्यामागे एक खास कारण आहे तो म्हणजे नुकताच पार पडलेला आयफा पुरस्कार सोहळा. या कार्यक्रमातील ‘धकधक गर्ल’चा नृत्याविष्कार पाहून सगळेच थक्क झाले आहेत. माधुरीने या पुरस्कार सोहळ्यात तिच्या अनेक लोकप्रिय गाण्यांवर डान्स केला. याशिवाय अभिनेत्री शाहरुख खानबरोबर “चाक धूम धूम...” गाण्यावर थिरकल्याचंही पाहायला मिळालं. याचे व्हिडीओ सध्या तुफान व्हायरल होत आहेत. वयाच्या ५७ व्या वर्षी “चोली के पीछे क्या है” गाण्यावर माधुरीला त्याच एनर्जीने डान्स करताना पाहून केवळ चाहतेच नाहीतर बॉलीवूड अभिनेता कार्तिक आर्यन सुद्धा थक्क झाल्याचं पाहायला मिळालं. याच सोहळ्यातील खास व्हिडीओ माधुरीने तिच्या इन्स्टाग्रामवर शेअर केला आहे.माधुरी दीक्षितचा परफॉर्मन्स झाल्यावर कार्तिक तिचं भरभरून कौतुक करत असल्याचं या व्हिडीओमध्ये पाहायला मिळतंय. कार्तिक माधुरीला म्हणतो, “किती जबरदस्त परफॉर्मन्स झाला... बाहेर सगळे तुम्हाला पाहून वेडे झालेत. एवढा सुंदर डान्स होता.

# अभिनेत्रीच्या घरी पाळणा हलला

अलीकडच्या काळातील सगळेच सेलिब्रिटी सोशल मीडियाच्या माध्यमातून आपल्या चाहत्यांच्या संपर्कात राहतात. आपल्या वैयक्तिक आयुष्यातील आनंदाचे क्षण हे कलाकार नेहमीच चाहत्यांबरोबर शेअर करत असतात. मराठी कलाविश्वातील अशाच एका लोकप्रिय अभिनेत्रीने प्रेक्षकांना गुडन्यूज दिली आहे. ‘ख्वाबों के परिंदे’, ‘यारीया २’ यांसारख्या हिंदी चित्रपटांसह ‘ऑटोग्राफ’, ‘बुगडी माझी सांडली गं’ या मराठी चित्रपटांमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका साकारणारी अभिनेत्री मानसी मोघे वयाच्या ३३ व्या वर्षी आई झाली आहे. अभिनेत्रीच्या घरी गोंडस बाळाचं आगमन झालं आहे. मानसी व तिच्या पतीने सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत ही गुडन्यूज त्यांच्या सर्व चाहत्यांना दिली आहे. काही दिवसांपूर्वी लग्नाच्या पहिल्या वाढदिवसाचं औचित्य साधत मानसीने हटके फोटोशूट करत गरोदर असल्याचं जाहीर केलं होतं.११ मार्च रोजी मानसीच्या घरी चिमुकल्याचं आगमन झालं आहे. मानसी व सूर्या शर्मा यांना मुलगा झाला आहे. “आज आमचं मन आनंदाने भरून आलं आहे. तुम्ही सर्वांनी दिलेलं प्रेम आणि शुभेच्छांसाठी खूप खूप आभार. आमच्या बाळाला लवकरच तुम्हा सगळ्यांसमोर आणण्यासाठी आम्ही उत्सुक आहोत.” अशी पोस्ट या जोडप्याने शेअर केली आहे. या पोस्टसह त्यांनी पालकत्व, बेबी बॉय, आमचं कुटुंब असे हॅशटॅग देखील शेअर केले आहेत. मराठमोळ्या मानसी मोघेने २०१३ मध्ये ‘मिस DIVE युनिव्हर्स’ हा खिताब देखील जिंकला होता. अभिनेत्री ( MANASI MOGHE ) सोशल मीडियावर प्रचंड सक्रिय असते. तिच्या पतीसह ती अनेक नवनवीन जागांवर भ्रमंती करताना दिसते. मानसी मोघेने २०२३ मध्ये हिंदी अभिनेता सूर्या शर्माशी लग्नगाठ बांधली. ‘अनदेखी’, ‘ये काली काली आँखे’, ‘होस्टेजेस’, ‘ब्राउन’ अशा लोकप्रिय सीरिजमध्ये सूर्या शर्माने काम केलेलं आहे. मानसी आणि सूर्याचा विवाहसोहळा थाटामाटात पार पडला होता. दरम्यान, सध्या मनोरंजन विश्वातून मानसी मोघे आणि सूर्या शर्मा यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला जात आहे.



# तुला जितकं सांगितलं आहे, तितकंच कर

सध्या बॉलीवूडमध्ये अभिनेत्रींना महत्वाचे स्थान आहे. ९० च्या दशकातील चित्रपटांच्या तुलनेत त्यांना स्क्रीनवर अधिक वेळही मिळत असल्याचे दिसते. बॉलीवूडमधील अभिनेत्री वर्चस्व गाजवताना दिसत आहेत. मात्र, एक काळ असा होता, जेव्हा अभिनेत्रींना गप्प बसवले जात असे, अभिनेत्री दिया मिर्झा(DIA MIRZA)ने म्हटले आहे. अभिनेत्रीने एका मुलाखतीत सलमान खान(SALMAN KHAN)ची प्रमुख भूमिका असलेल्या ‘तुमको ना भूल पाएँगे’ या चित्रपटात काम करताना काय अनुभव आला होता, याबद्दल वक्तव्य केले आहे.अभिनेत्री दिया मिर्झाने नुकतीच झूमला मुलाखत दिली. या मुलाखतीत पूर्वी बॉलीवूडमध्ये अभिनेत्रींसाठी काम करण्यासाठी कसे वातावरण होते? असा प्रश्न विचारण्यात आला. यावर बोलताना अभिनेत्रीने म्हटले, “बऱ्याचदा असे व्हायचे की तुमच्या पुरूष सहकलाकाराच्या कोणत्या तारखांना शूट होऊ शकते, यानुसार शूटिंग व्हायचे. त्यांना कोणते ठिकाण योग्य वाटते, त्याचा विचार केला जायचा. हे आतासुद्धा होते. पण जर तुम्हाला पटकथा माहित असेल, त्यातून मार्ग काढणे सोपे आहे. त्यावेळी आम्हाला काहीच माहित नसायचे.”पुढे दिया मिर्झाने ‘तुमको ना भूल पाएँगे’ या चित्रपटाचे उदाहरण देत स्पष्ट केले की हिंदी चित्रपटसृष्टीतील सर्वात उत्तम टीमबरोबर काम करत असूनही महिला कलाकारांकडे दुर्लक्ष केले जायचे. अभिनेत्रीने म्हटले, “तुमको ना भूल पाएँगे या चित्रपटाचे दिग्दर्शक पंकज पाराशर हे होते. त्यांनी त्याआधी चालबाज चित्रपटाचे दिग्दर्शन केले होते. सलमान खान मुख्य भूमिकेत होता. चित्रपटाचे निर्मातेही प्रसिद्ध होते. त्यामुळे त्या चित्रपटाचा भाग असल्याबद्दल मला छान वाटत होते. पटकथेतील सर्व गोष्टी व्यवस्थित असाव्यात, यासाठी त्यांनी खूप खर्च केला. पण स्क्रीप्ट उपलब्ध नव्हती. कोणतेही वर्कशॉप झाले नाहीत. रीडिंग झाले नाहीत. सीन्स भोजपूरीमध्ये लिहिले होते. मी जी भूमिका साकारत होते, ती मुलगी राजस्थानची होती आणि भोजपूरीमध्ये बोलत होती. मला जे संवाद बोलायचे होते, ते शूटिंग सुरू होण्याच्या काही वेळ आधी दिले होते.” जेव्हा दियाने तिच्या पात्राबद्दल प्रश्न विचारले. तेव्हा तिला उत्तर देणे टाळले गेले.

# रोहित शर्माचं मिशन बदलापूर?

## हिटमॅनच्या निवृत्तीबाबत रिकी पॉन्टिंगचं सूचक वक्तव्य

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ नंतर भारतीय संघाचा कर्णधार रोहित शर्मा वनडे क्रिकेटमधून निवृत्ती घेणार असल्याची चर्चा जोर धरून होती. पण रोहितने मी वनडेमधून निवृत्त होत नसल्याचे सांगितले. दोन वेळा टी-२० विश्वचषक आणि दोनदा चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकणाऱ्या रोहित शर्माला अजूनही एकदिवसीय विश्वचषक जेतेपदाची प्रतिक्षा आहे. सुमारे १० महिन्यांत दोन विजेतेपदे जिंकल्यानंतर, रोहितला आता २०२७ मध्ये होणाऱ्या एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेत खेळणार का? यावर रोहितने उत्तर दिलं आहे.**




भारतीय संघाचा कर्णधार रोहित शर्मा याने अलीकडेच टी-२० क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली. रोहितच्या नेतृत्वाखाली भारताने टी-२० विश्वचषक जिंकल्यानंतर रोहितने निवृत्तीची घोषणा केली. त्यानंतर भारत नुकताच रोहितच्या नेतृत्वाखाली चॅम्पियन्स करंडक स्पर्धा जिंकला आहे. या स्पर्धेनंतर रोहित एकदिवसीय क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर करेल अशी चर्चा होती. मात्र रोहितने स्पष्ट केलं की त्याच्या डोक्यात सध्या निवृत्तीचा विचार नाही. दरम्यान, ऑस्ट्रेलियाचा माजी कर्णधार रिकी पॉन्टिंग याने रोहितच्या निवृत्तीबाबत महत्त्वाचं वक्तव्य केलं आहे. रिकी पॉन्टिंग म्हणाला, "२०२३ च्या एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलियाने भारताचा पराभव केला होता.

हा पराभव रोहित विसरू शकलेला नाही. त्यामुळेच रोहित आता पुढच्या एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेची तयारी करत आहे. भारतीय संघाच्या कर्णधाराला स्वतःला आणखी एक संधी द्यायची आहे. त्याचबरोबर रोहितची चॅम्पियन्स करंडक स्पर्धेतील कामगिरी पाहिली तर तुमच्याही लक्षात येईल की सध्या तरी रोहितच्या निवृत्तीची वेळ आलेली नाही. त्याच्यात अजून बरंच क्रिकेट बाकी आहे. रोहितला २०२७ ची एकदिवसीय विश्वचषक स्पर्धा खेळायची आहे. तो सध्या त्याच स्पर्धेचा विचार करतोय. चॅम्पियन्स करंडक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात टीम इंडियाने विजेतेपद पटकावल्यानंतर रोहित शर्माने त्याच्या आगामी कारकिर्दीविषयी भाष्य केलं. हा त्याचा शेवटचा एकदिवसीय सामना असेल असं म्हटलं जात होतं. परंतु, रोहितने या अफवांचं खंडण केलं आणि २०२७ च्या वर्ल्डकपबाबत भाष्य केलं. रोहित म्हणाला, "सध्या माझ्या दिशेने जशा गोष्टी येत आहेत, तसा मी त्या स्वीकारत आहे. खूप पुढचा विचार करणं योग्य नाही.

### खेळण्याबाबत मोठं वक्तव्य

मी २०२७ च्या विश्वचषकात खेळेन की नाही हे आताच सांगू शकत नाही. सध्या अशी वक्तव्ये करण्यात काही अर्थ नाही. वास्तववादी दृष्टिकोनातून, मी नेहमीच माझ्या कारकिर्दीत एक-एक पाऊल टाकले आहे," रोहित शर्मा म्हणाला, "मी भविष्याबाबत फार विचार करत नाही, मला मुळात याबाबत जास्त विचार करायला आवडत नाही आणि मी याआधीही असं कधी केलं नाही. सध्या तरी मी माझ्या क्रिकेटचा आणि या संघाबरोबर विजयी क्षणांचा आनंद घेत आहे. मला आशा आहे की माझ्या सहकाऱ्यांनाही माझी उपस्थिती आवडत असेल. सध्या तरी तेवढंच महत्त्वाचं आहे. भारताचा पराभव केला होता. हा पराभव रोहित विसरू शकलेला नाही. त्यामुळेच रोहित आता पुढच्या एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेची तयारी करत आहे. भारतीय संघाच्या कर्णधाराला स्वतःला आणखी एक संधी द्यायची आहे.

---

# ट्रॉफी फायनलचा विजय कचऱ्यात टाका

## तनवीरला इंडियाची चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकणं पचलेलं नाही

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ मध्ये भारतीय संघाने एकही सामना न गमावता आयसीसी स्पर्धेचे जेतेपद आपल्या नावे केले. भारताने अंतिम सामन्यात न्यूझीलंडचा ४ विकेट्सने पराभव करत १२ वर्षांनी या स्पर्धेच्या करंडकावर आपले नाव कोरले. यंदाच्या या चॅम्पियन्स ट्रॉफीचे यजमानपद पाकिस्तानकडे होते. पण पाकिस्तानचा संघ गट टप्प्यात सुरूवातीचे दोन्ही सामने गमावत स्पर्धेतून बाहेर झाला. पण भारताने मात्र स्पर्धेत अपराजित राहत जेतेपदही नावे केले. भारताच्या या विजयाने पाकिस्तानच्या माजी खेळाडूला चांगल्याच मिरच्या लागल्या आहेत.**



माजी पाकिस्तानी क्रिकेटपटू तनवीर अहमदला टीम इंडियाची चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकणं पचलेलं नाही, कदाचित त्यामुळेच तो त्याच्या यूट्यूब चॅनलवर वादग्रस्त वक्तव्य करताना दिसला. दुबईत भारताच्या बाजूने खेळपट्टी जाणूनबुजून तयार करण्यात आली होती असा आरोप तनवीर अहमदने केला आहे. भारताने आपली चॅम्पियन्स ट्रॉफी कचऱ्यात टाकली पाहिजे, असे तो म्हणाला. पाकिस्तानचा माजी क्रिकेटपटू तनवीर अहमदने त्याच्या यूट्यूब चॅनलवर भारताच्या विजयावर वादग्रस्त विधान केले आहे. त्याने आयसीसीचे अध्यक्ष जय शाह यांच्यावर दुबईत भारताच्या बाजूने खेळपट्टी तयार केल्याचा आरोप केला. तन्वीरने असे म्हटले आहे की, "भारताने चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ चा फायनलमधील विजय कचऱ्यात टाकला पाहिजे कारण या विजयाची काहीच किंमत नाही." आयसीसीचे अध्यक्ष जय शाह यांच्यावरही त्याने मोठं वक्तव्य केलं आणि म्हणाला, "हेच तर जय शाहला हवं होतं. भारताने चॅम्पियन्स ट्रॉफी फायनल जिंकावी हेच त्याला हवं होतं. संपूर्ण जग ओरडून सांगतंय की भारताचे सर्व सामने एकाच ठिकाणी खेळले जात आहेत, ज्याचा फायदा होतोय. मग आजची (फायनलच्या दिवशी) खेळपट्टी पाहा. तुम्ही ती खेळपट्टी अधिक सपाट आणि कोरडी का नाही केली? अजून स्लो करायची होती, जे जमेल ते करायचं होतं. बीसीसीआय आधीच नाटकी बोर्ड आहे आणि त्यांचा माणूस जय शाह आयसीसीचा चेयरमन झालाय.

### अक्षर पटेलला संघाचे नेतृत्त्व

जो पूर्ण वेळ तिथेच बसून असतो. मग साधी गोष्ट आहे की त्याचा संघ जिंकणारच. जेव्हापासून हायब्रिडची चर्चा होती तेव्हाच सगळे बोलत होते भारत जिंकणार..." तन्वीर अहमद यांनी दुबई आणि पाकिस्तानातील खेळपट्टीशी तुलना करत सांगितले, "पाकिस्तानमध्ये, फलंदाजीसाठी अनुकूल खेळपट्टी होती जिथे फिरकी गोलंदाजांना मदत नव्हती. जर भारत तिथे खेळला असता तर त्यांनी चांगली कामगिरी केली असती, परंतु त्यांचे फिरकी गोलंदाजांनी वर्चस्व गाजवले. त्यामुळे भारतासाठी हा एक मोठा फायदा होता. असे विजय कचऱ्याच्या डब्यात टाकले पाहिजेत. हा खरा विजय नाही. ते पाकिस्तानात का आले नाहीत?" न्यूझीलंडविरुद्ध भारताने शानदार कामगिरी करत सामना जिंकला. रोहित शर्माशिवाय संघातील इतर खेळाडूंनीही महत्त्वाची भूमिका बजावली. हा विजय भारतीय क्रिकेटसाठी ऐतिहासिक ठरला आणि यामुळे संघाला तिसऱ्यांदा चॅम्पियन्स ट्रॉफी पटकावता आली. माजी पाकिस्तानी क्रिकेटपटू तनवीर अहमदला टीम इंडियाची चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकणं पचलेलं नाही, कदाचित त्यामुळेच तो त्याच्या यूट्यूब चॅनलवर वादग्रस्त वक्तव्य करताना दिसला. दुबईत भारताच्या बाजूने खेळपट्टी जाणूनबुजून तयार करण्यात आली होती असा आरोप तनवीर अहमदने केला आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज™
ePaper
epaper.mahaenews.com
। गुरुवार ।
। दि. 13 मार्च 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## सेवा , मदत करने प्रत्येकाचे कर्तव्यच

# मानव सेवा हीच ईश्वर सेवा भावनेतून रुग्णसेवा व्हावी!

## फोर्स मोटर्सचे अध्यक्ष अभय फिरोदिया : शहरात प्रथमच डायग्नोस्टिक सेंटरमध्ये पेट स्कॅन मशीन

। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी । महाईन्यूज

**जैन समाज बांधव परंपरागत विविध क्षेत्रात व्यवसाय करतात . त्याचबरोबर परोपकारक देखील करतात ही परंपरा आहे. व्यवसायातुन नुसता नफा मिळविणे हे अपेक्षीत नसुन सेवा , मदत करने प्रत्येकाचे कर्तव्यच असुन त्याचे संतुलन ठेवणे देखील महत्त्वाचे आहे. मूल्यावर आधारित आपले जीवन जगायचे असेल तर, मानव सेवा हीच ईश्वर सेवा मानून याचा ध्यास प्रत्येकानी अंगीकारून व्यवसायाबरोबरच मानवी सेवा प्रामाणिकपणे कर्तव्य या जाणिवेतून करावी. मात्र, परोपकार करताना आपला धर्म बाजूला ठेवावा, असे आवाहन फोर्स मोटर्सचे अध्यक्ष अभय फिरोदिया यांनी केले.**



सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून कर्करोग, ट्युमर, हाडांचे गंभीर आजारापासून शहरवासीयांना वेळीच त्वरित निदान व्हावे , तज्ञ डॉक्टराकरवी उपचार मिळावे ,यासाठी कमला एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक सचिव डॉ शैलेश शर्मा , डॉ दीपक शहा, डॉ महेश बोरा ,,, डॉ केविन बोरा, या संचालकांनी एकत्र येत सामूहिकरीत्या अत्याधुनिक तंत्रज्ञानासह आणि माफक दरात पिंपरी-चिंचवड शहरात प्रथमच एसडीएम डायग्नोस्टिक सेंटरमध्ये पेट ( पीईटी ) स्कॅन मशीन अत्याधुनिक सुविधा उपलब्ध केली आहे. त्याचे उद्घाटन फोर्स मोटर्सचे अध्यक्ष अभय फिरोदिया यांच्या हस्ते फित कापून करण्यात आले. यावेळी आशीर्वाद देण्यासाठी जेपी गुरुदेव महाराज याच्या समवेत प्रमुख पाहुणे म्हणून पुणे येथील नाईक हॉस्पिटलचे संचालक डॉ सत्यशील नाईक, फलटण येथील लायन्स क्लबचे माजी प्रांतपाल भोजराज नाईक - निंबाळकर ,डॉ सचिन गांधी , डॉ संजय कुलकर्णी ,पुनीत बालन समवेत त्यांची पत्नी जानव्ही बालन, शोभा धारीवाल , ओम प्रकाश रांका, राजेश शहा, दीपक बोरा ,डॉ शैलेश गुजर , राजकुमार चोरडिया, प्रकाश धोका, कमला एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षा प्रतिभा शहा, खजिनदार डॉ,भूपाली शहा ,एसडीएम डायग्नोस्टिकचे संचालक डॉ शैलेश शर्मा , डॉ दीपक शहा, डॉ महेश बोरा, डॉ केविन बोरा, तेजस शर्मा समवेत विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते . यावेळी उद्घाटक व प्रमुख पाहुण्यांचा शालपुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाची प्रस्तावना व सूत्रसंचालन संचालक डॉ दीपक शहा यांनी केले. डॉ महेश बोरा यांनी आभार मानले.



### मानवता शिवाय मानवी धर्म असफल...

जेपी गुरुदेव महाराज आशीर्वाद देताना आपल्या प्रवचनात म्हणाले, मानवता शिवाय मानवी धर्म असफल असते. रुग्णालयात येणाऱ्या रुग्णासाठी सर्व अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून दिल्या तरी ,येथे जास्त दिवस राहन्यासाठी कुठल्याही रुग्णाला आवडत नाही. डॉक्टरांकडून उपचार करून लवकरात लवकर बरा होऊन हसतमुख स्वस्थ होऊन आपल्या घरी जावावा हीच अपेक्षा व्यक्त केली . माझ्या मते हीच ईश्वरी सेवा आहे .

### स्कॅन मशीन हे अत्याधुनिक महागडे मशीन...

प्रमुख पाहुणे डॉ सत्यशील नाईक म्हणाले पेट ( पीईटी ) स्कॅन मशीन हे अत्याधुनिक महागडे मशीन आहे. ज्याच्यामुळे रुग्णाला कर्करोग, ट्युमर, हाडांचे आजार आदीचे अचूक निदान लवकरात लवकर होते. कर्करोग शरीरात किती प्रमाणात पसरला आहे हे डॉक्टरांना तात्काळ समजते. त्यामुळे रुग्णावर उपचार करून या रुग्णांना दिलासा , जीवदान मिळू शकेल . रूग्णाच्या तक्रारी असल्या तरी रुग्णाचे खुब्यांचे फ्रॅक्चर एक्स-रे मशीन द्वारे दिसून येत नाही. परंतु पेट ( पीईटी ) स्कॅन मशीनद्वारे तपासणी केली तर तात्काळ फ्रॅक्चर दिसून येतो. नागरीकाना आवाहन करताना म्हणाले , प्रत्येकाने आरोग्य विमा काढावा, कारण प्रसंगी रुग्ण व कुटुंबीयांना आर्थिक समस्याना सामोरे जाण्याची वेळ येणार नाही. राज्य सरकारने ग्रामीण भागातही पेट ( पीईटी ) स्कॅन मशीन ठराविक ठिकाणी सुरू करणे ही नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने फारच गरजेचे असल्याचे प्रतिपादन केले.


EDUCATING MIND & HEART
Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
42
Years of Excellence in Education
ADMISSIONS OPEN
FOR AY 2025-26
Holistic Empowering Learning
IT ALL STARTS HERE
42
YEARS OF ENRICHING EXPERIENCE OF EDUCATION
55+
NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS OUR SCHOOLS
11+
CAMPUSES IN AND AROUND PUNE, MAHARASHTRA
17K+
17,000 STUDENTS ACROSS CAMPUSES
600+
TEACHING AND NON TEACHING STAFF
13K+
13,000 ALUMNI ACROSS GLOBE
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
BHOSARI | INDRAYANI NAGAR | MOSHI | CHAKAN | ALANDI | SHIVAJINAGAR | NANEKARWADI | WANOWRIE | SATARA
+91 8668755826
alandi@priyadarshanischools.org
www.priyadarshanischools.org


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046


Golden opportunity for Pune & PCMC student's
GURUKUL
ONLINE
CLASSES
YOUR CHILD'S FUTURE
IS OUR PRIORITY
Nursary to 7th
All Subjects, Only Special
Subject Available..
Math's, EVS, All language
Admission Open
Batch Starts 7th June 2023
MORE INFO
96577 67000 / 70209 85375
EXPRESS MEDIA ENTERPRISES
आजच प्रवेश निश्चित करा...आणि निश्चिंत रहा..!